नियमित फौजदारी खटला नं.११६१/२०२२
निशाणी- २७

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- संदीप प्रभाकर दातरंगे
वयः- ४० वर्षे, धंदाः- रिक्षा चालक.
राहणार- दातरंगेमळा, वारुळाचा मारुतीरोड, नालेगाव, अहमदनगर.

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील
श्री.ए.एस.यादव यांचेकडूनः-

१. मी आरोपींना ओळखतो. ते आमचे भावकीतील आहेत. आरोपी हे आमची जमीन मागत होते. आरोपींनी त्यांच्या हिश्यातील जमीन विकलेली आहे. दि.२७-०३-२०२२ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता मी घरी येत असताना महादेव मंदीराशेजारी शुभम दातरंगे याने मला रस्त्यात आडवून शिवीगाळ करुन कानाचे पाठीमागे दोन-तीन फटके मारले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला जावून एनसी दाखल केली.

२. दि.३०-०३-२०२२ रोजी रात्री १०.०० वाजता मी व माझी मुलगी प्रियंका असे गाडीत पेट्रोल टाकण्यासाठी जात असताना महादेव मंदीराशेजारी चौकात दत्ता दातरंगे, अक्षय दातरंगे आणि शुभम दातरंगे हे उभे होते. त्यावेळी माझ्या मुलीने मला विचारले की, "पप्पा तुम्हाला कोणी मारले होते". त्यानंतर मी दत्ता दातरंगे, अक्षय दातरंगे व शुभम दातरंगे यांचेकडे बोट दाखवून सांगितले यांनी मारले होते. त्यावेळी दत्ता दातरंगे याने म्हटले की, " आमचेकडे हात करतो काय". त्यानंतर दत्ता दातरंगे, अक्षय दातरंगे व शुभम दातरंगे पळत आमच्याकडे आले. शुभम व अक्षय यांनी मला लाथाबुक्क्याने मारले. दत्ता दातरंगे याने ब्लेडने माझे छातीवर व उजव्या दंडावर मारले. त्यानंतर मुलगी रडयला लागल्याने आम्ही पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी आम्हाला सिव्हील हॉस्पीटलला पाठवले. औषधोपचार घेऊन पुन्हा पोलीस स्टेशनला आलो व फिर्याद दिली. सदर फिर्याद मला दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास

नि.२८ देण्यात येत आहे. मी आरोपींना ओळखतो. आरोपी अक्षय आज हजर आहे. ज्या ब्लेडने मला मारले होते, ते दाखवल्यास मी ओळखू शकतो. मला जप्त ब्लेड दाखवले. ते ब्लेड हेच आहे. त्यास आर्टिकल 'अ' देण्यात येत आहे. मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यातील घटनास्थळाचे वर्णन बरोबर आहे.

उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. श्रीकांत गवळी यांचेकडूनः-

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचा व आमचा जमीनीवरुन वाद आहे. आमच्या जमीनी पुणे बायपासला लागून आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचे जमीन कल्याण रोडला असलेला भुषणनगरकडे जाणारा लिंक रोडला लागून आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचे व आमची जमीन शेजारी शेजारी नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या पेक्षा जास्त जमीन आरोपींकडे आहे. आरोपींच्या जमीनीचे गट नंबर मला सांगता येत नाही. माझ्या शेतीचा गट नंबर ४१ आहे. माझी जमीन मी स्वतः कसतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची जमीन माझे राहते घरापासून जवळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची जमीन मला बटाईने कसण्यासाठी पाहिजे होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचे शेती व्यतिरिक्त इतर व्यवसाय आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या राहत्या इमारतीत भाडेकरु असून त्यातूनही त्यांना उत्पन्न मिळतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची आर्थिक परिस्थिती सधन आहे.

४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ शुभम हा ज्युदो चॅम्पीयन आहे. हे मला माहित नाही की, आरोपी क्र.२ हा राष्ट्रीयस्तरावरील ज्युदोच्या स्पर्धांमध्ये भाग घेतो. हे मला माहित नाही की, आरोपी क्र.२ हा स्पर्धापरिक्षेची तयारी करतो.

५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी त्यांच्या वडीलोपार्जित जमीनी आजपर्यंत विकलेल्या नाहीत. आरोपींनी वडीलोपार्जित जमीनी विकल्या हे दाखवण्यासाठी माझेकडे पुरावा नाही. माझे राहते घर आरोपींच्या राहत्या घरापासून पाचशे मिटरपेक्षा कमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला

गावात यायचे असेल तर आम्ही मुख्य रस्त्याने म्हणजे वारुळाच्या मारुतीच्या कमानीपर्यंत असलेल्या रस्त्याने येतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे घरापासून ते वारुळाच्या मारुतीच्या रस्त्याचे कमानीपर्यंत आरोपींचे घर नाही. हे म्हणणे खरे आहे की, वारुळाच्या मारुतीच्या रस्त्याच्या कमानीपासून नेप्ती नाका हा मुख्य रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, नेप्ती नाक्याकडून कल्याण रोडला जाताना नदीच्या पलिकडे पेट्रोलपंप आहे, तेथे आम्ही पेट्रोल भरण्यास जातो. हे म्हणणे खरे आहे की, वारुळाच्या मारुतीच्या रस्त्याच्या कमानीपासून ते नेप्ती नाकाकडे जाणा-या रस्त्याच्या पश्चिमेला असलेल्या अरुंद बोळीमध्ये दिडशे ते दोनशे फुट आत आरोपींचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचे घर दाट लोकवस्तीमध्ये आहे.

६. हे म्हणणे खरे आहे की, सदर तक्रार देण्यापुर्वी मी आरोपींविरुध्द दोन अदखलपात्र गुन्हयाच्या तक्रारी दिलेल्या होत्या. त्या तक्रारींच्या अनुषंगाने मी आरोपींविरुध्द न्यायालयात खाजगी तक्रार दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या तक्रारी खोटया होत्या म्हणुन मी त्याबाबत न्यायालयात खाजगी तक्रार दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दाट लोकवस्तीत राहत असल्याने तेथे काही विपरीत घटना घडली तर आजूबाजूचे लोक तात्काळ जमा होतात. हे म्हणणे खरे नाही की, दि.३०-०३-२०२२ रोजी रात्री १०.०० ते १०.१५ चे दरम्यान मी आरोपींच्या घरापासून कधीही गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या घराशेजारी महादेवाचे मंदीर नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर महादेव मंदीर नसल्याने घटनास्थळ पंचनाम्यामध्ये तसे नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या घराजवळून जाण्यासाठी माझा वहिवाटीचा रस्ता नसल्याने मी तेथे जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ व ३ यांनी मला लाथाबुक्क्याने तसेच आरोपी क्र.१ ने ब्लेडने छातीवर व उजव्या दंडावर कधीही मारले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.३०-०३-२०२२ रोजी रात्री १०.०० वाजता मी मुलीला घेऊन पेट्रोल भरण्यासाठी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ ला शासकीय

नोकरी मिळू नये व त्यांची जमीन मला बटाईने कसण्यासाठी मिळावी म्हणुन त्यांचया विरुध्द ही दखलपात्र गुन्हयाची खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, दि.२७-०३-२०२२ रोजी तक्रार देऊन काही झाले नाही म्हणुन दि.३०-०३-२०२२ रोजी ही खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सारख्या खोटया तक्रारी देतो असा अर्ज आरोपी क्र.२ ने कोतवाली पोलीस स्टेशनला दिला होता व त्याकामी मला चौकशीसाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना झालेली नसताना मी घटनास्थळ दाखवले. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरुन कोणतेही ब्लेड जप्त केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तपासामध्ये पोलीसांनी माझेकडून रक्ताने माखलेले कपडे जप्त केले नाही.

७. दि.२७-०३-२०२२ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता मी घरी येत असताना महादेव मंदीराशेजारी शुभम दातरंगे याने मला रस्त्यात आडवून शिवीगाळ करुन कानाचे पाठीमागे दोन-तीन फटके मारले, ही बाब मी पोलीसांना तक्रार देताना सांगितली होती. दि.३०-०३-२०२२ रोजी रात्री १०.०० वाजता महादेव मंदीर चौकात आरोपी उभे होते, ही बाब मी पोलीसांना सांगितली होती. त्यावेळी दत्ता दातरंगे याने म्हटले की, " आमचेकडे हात करतो काय", त्यानंतर दत्ता दातरंगे, अक्षय दातरंगे व शुभम दातरंगे पळत आमच्याकडे आले, ही बाब मी पोलीसांना सांगितली होती. सदर बाबी पोलीसांनी माझे फिर्यादमध्ये का नमुद केले नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.३०-०३-२०२२ रोजी आरोपींनी मला कोठेही जखम केलेली नसून मी खोटी तक्रार दिली.

(मध्यंतरामुळे उलट तपास तहकुब करण्यात आला.)

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत, | समक्ष, |
| सही/- | सही/- |
| ( रा. धों. चव्हाण )<br>मुख्य न्यायदंडाधिकारी<br>अहमदनगर. | ( रा. धों. चव्हाण )<br>मुख्य न्यायदंडाधिकारी<br>अहमदनगर. |

दि.०१/०१/२०२४.

<u>उर्वरीत उलट तपास शपथेवर आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. श्रीकांत गवळी यांचेकडूनः-</u>

८. हे म्हणणे खरे नाही की, दि.३०-०३-२०२२ रोजी मी आणि मुलगी कोठेही गेलो नसल्याने व मुलीसमोर काहीही घडले नसल्याने मुलीचा जबाब पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.
फेर तपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत, | समक्ष, |
| सही/- | सही/- |
| ( रा. धों. चव्हाण )<br>मुख्य न्यायदंडाधिकारी<br>अहमदनगर. | ( रा. धों. चव्हाण )<br>मुख्य न्यायदंडाधिकारी<br>अहमदनगर. |

दि.०१/०१/२०२४.